**Niramaya Hospitals**
**Publication: Prahaar**
**Main Edition**
**Date: 23rd May 2013**
**Page No: 04**
**Edition: Mumbai -Navi Mumbai -Thane - Raigad (Print & Online)**

---

# महिलेच्या पोटात १२ इंचाचा ट्युमर

**मुंबई** *(प्रतिनिधी)*

पनवेल येथील एका महिलेच्या पोटात तब्बल १२ इंच लांबीचा ट्युमर आढळून आला. खारघर येथील निरामया रुग्णालयात नुकतीच या महिलेवर लेप्रोस्कोपी शस्त्रक्रिया करून हा ट्युमर यशस्वीरीत्या बाहेर काढण्यात आला. ट्युमर एवढा वाढण्याची आणि तो लेझर तंत्रज्ञानाद्वारे काढण्याची ही दुर्मीळ घटना आहे.

पनवेल येथे राहणाऱ्या एका ४० वर्षीय महिलेला गेल्या काही महिन्यांपासून पोटदुखीचा त्रास होता. तसेच तिच्या पोटाचा घेर दिवसेंदिवस वाढतच होता. मात्र, याकडे विशेष लक्ष न दिल्याने मे महिन्याच्या सुरुवातीला त्या महिलेला श्वसनक्रियेचाही त्रास होऊ लागला. त्यानंतर तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिच्या पोटात उजव्या बाजूला ओटीपोटापासून बरगड्यांपर्यंत १२ इंच लांबीचा ट्युमर असल्याचे कळले. या ट्युमरला मॉसिनीस सीस्था डिनोमा असे म्हणतात. यावर वेळीच उपचार न केल्यास तो फाटून रुग्णाच्या जीवाला धोकाही निर्माण होऊ शकतो. हे ओळखून लोप्रोस्कोपी शल्यविशारद डॉ. अमित थडानी यांनी तातडीने शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला. ही शस्त्रक्रिया यशस्वी झाली.

हा अंडाशयाचा (ओव्हरी) ट्युमर होता. सामान्यतः अशा प्रकरणात संपूर्ण पोट फाडून ट्युमर काढला जातो. मात्र, या यावेळी लेझर तंत्रज्ञानाचा वापर केल्याने शस्त्रक्रिया करून पीडित महिलेला दोन दिवसांतच घरी पाठवणे शक्य झाले, अशी माहिती डॉ. थडानी यांनी दिली. तसेच या ट्युमरची कर्करोग चाचणीही करण्यात आली असून, तो कर्करोगचा ट्युमर नसल्याचेही त्यांनी सांगितले.